जाहिरात क्र. १/२११ , दि. २०/०८/१०

# पुणे महानगरपालिका

## जाहिरात प्रकटन

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील उद्यान विभागाकडील डायरेक्टर (झू) या पदासाठी निवडयादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र | पदनाम | वेतन श्रेणी | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डायरेक्टर (झू) (वर्ग अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० (ग्रेड पे+ मान्य भत्ते) | १) एम. व्ही. एस्सी.<br>२) किमान १० वर्षाचा प्राणी संग्रहालया-मधील कामाचा अनुभव<br>किंवा<br>वन्य प्राणी देखभालीबाबत भारतीय अथवा परदेशातील विद्यापीठाची पदवी व किमान १० वर्षाचा अनुभव<br>किंवा<br>वन खात्याकडील असिस्टंट कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट दर्जाचा अधिकारी | १ | निवडयादी १- खुला | **उद्यान विभाग** |

**अटी:-**

१) <u>वयोमर्यादा</u> :-

**(अ)** जाहिरातीचे दिनांकास किमान वय १८ वर्षे पुर्ण असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे

**(ब)** माजी सैनिक, अपंग व प्रकल्पग्रस्त/भूकंपप्रगस्त यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**(क)** स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्य/खेळाडू यांना ५ वर्ष शिथीलक्षम व जनगणना अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

**(ड)** पुणे महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या उमेदवारास कमाल वयाची अट लागू होणार नाही.

२) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

३) अर्जामध्ये अपंग, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक याचा स्पष्ट उल्लेख करावा व त्याबाबतचे आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडवीत. प्रमाणपत्रे जोडली नसल्यास त्यास समांतर आरक्षणाचा फायदा दिला जाणार नाही.

४) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.

५) वरील अनुक्रमांक १ ते ५ येथील पदासाठी दिनांक ०७/०८/२००१ व दिनांक २०/०७/२००२ व आजपर्यंतच्या सर्व शासन निर्णयान्वये DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर, किंवा A स्तर, किंवा B स्तर, किंवा C स्तर, किंवा MS-CIT परिक्षा नेमणूक झाल्यापासून २ वर्षात उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

६) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णयानुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

७) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता-गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (टु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अशा अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८) वरील पदांवर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहील.

९) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

१०) उमेदवार सरकारी/निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खातेप्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

११) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

१३) अर्जदार महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१४) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी अपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१५) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर व्ही २०००/प्र.क्र. १७/२०००/१२, दि.१/७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि.२८/३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६) रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका हे स्वत:कडे राखून ठेवीत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१७) **बिगर मागास गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रु. १००/- किंमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा. महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली सेवकवर्ग विभाग कार्यालय, रुम नं.२४०, दुसरा मजला, पुणे मनपा, मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे ५ येथे दि.२३/०८/२०१० ते दि.०३/०९/२०१० अखेर (पर्यंत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील व दि.०४/०९/२०१० दुपारी ४.०० पर्यंत सेवकवर्ग विभाग कार्यालय, रुम नं.२४०, दुसरा मजला, पुणे मनपा, मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे ५ येथे स्विकारले जातील. सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.**

**सही/-**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**